## निशाणी १ वरील आदेश

[ कौसल्याबाई हिरवे विरुध्द निरंक ]

१. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मुंबई वारसा कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे मयत ज्ञानोबा बापुराव हिरवे यांचे ते वारस आहेत असे कथन करुन वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र. १ ही मयत ज्ञानोबा बापुराव हिरवे यांची पत्नी असुन अर्जदार क्रं. २ व ३ हे मुले, अर्जदार क्रं. ४ ही सुन, अर्जदार क्रं. ५ व ६ हया नाती व अर्जदार क्रं. ७ हा नातु आहे. मयत ज्ञानोबा बापुराव हिरवे हे दिनांक ०७.०४.२०२२ रोजी मयत झाले. तसेच अर्जदार क्रं ४ चा पती आणि मयत ज्ञानोबा यांचा मुलगा नामे एकनाथ ज्ञानोबा हिरवे हे देखील दिनांक ३१.०३२०२२ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांना विविध सरकारी कार्यालये तसेच निमसरकारी कार्यालयामध्ये वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत ज्ञानोबा बापुराव हिरवे यांना अर्जदार व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

३. अर्जदार क्र. ३ ने निशाणी १४ वर स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील मजकुराचा शपथेवर पुनरउच्चार केला आहे. याशिवाय, अर्जदारांनी ज्ञानोबा बापुराव हिरवे आणि एकनाथ ज्ञानोबा हिरवे यांच्या मृत्युच्या प्रमाणपत्राची प्रत निशाणी १५ व १६ वर दाखल केली आहे. तसेच अर्जदारांनी निशाणी १७ ते २३ वर आधारकार्डच्या प्रती दाखल केले आहे. अर्जदार वगळता मयत ज्ञानोबा बापुराव हिरवे यांना इतर कोणीही वारस नसल्याचे अर्जदाराने पुराव्यात सांगीतले आहे.

४. अर्जदारांनी निशाणी २४ वर दिनांक १४.०१.२०२३ रोजीच्या दै. गाववाला या वृत्तपत्रात अर्जदारांचे नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाची हरकत असले बाबत जाहीर नोटीस प्रकाशीत करुन हरकती मागवल्या आहेत पण त्याअनुषंगाने आजतागायत कोणाचीही हरकत या न्यायालयास प्राप्त झालेली नाही. अर्जदाराने पुरावा बंद पुरसीस दाखल केली आहे.

५. वारस प्रमाणपत्राच्या आधारे वारसांना मयताच्या संपतीमध्ये मालकी हक्क प्रदान होत नाहीत, न्यायालय सदरच्या अर्जाच्या चौकशी दरम्यान अर्जदारांना मयताच्या संपत्तीत हक्क व अधिकार आहेत अथवा नाहीत असा आदेश देवु शकत नाही ही बाब

**2006(6) Bom.C.R. 56 Aloysius Manuel D'souza and ors. -vs.- Mary Kamala William Manuel D'souza** या न्यायनिवाडयात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्पष्ट केली आहे.

६. अर्जदार हे मयत ज्ञानोबा बापुराव हिरवे यांचे वारस असल्याचे शपथपत्रावर कथन केले अाहे. अर्जदाराने निशाणी २४ वरील जाहीर नोटीस प्रसिध्दी केली आहे. परंतु, त्या जाहीर नोटीसीस आज अखेर कोणीही आक्षेप नोंदवलेला नाही. अर्जदार यांच्या शपथपत्रातील कथनावर अविश्वास ठेवण्यासारखे काही नाही. त्यामुळे अर्जदार हे मयत ज्ञानोबा बापुराव हिरवे यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यास कोणतीही अडचण नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

**– आदेश –**

**१.** अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** अर्जदार क्र. १ ते ७ हे **मयत ज्ञानोबा बापुराव हिरवे** यांचे कायदेशीर वारस असल्या बाबत वारसा प्रमाणपत्र जारी करण्यात यावे त्याकरीता अर्जदाराने योग्य तो न्यायशुल्क मुद्रांक ८ दिवसाच्या आत जमा करावा.

मानवत.
दिनांक ०१.०३.२०२३

**( जी. ए. करजगर )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मानवत.

Ganesh Arun Karajgar

Digitally signed by Ganesh Arun Karajgar
Date: 2023.04.06 13:46:49 +0530